**NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE**

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक ०४.०९.२०२६ शुक्रवार**

**१) मा. न्यायालयातुन आरोपीस सश्रम कारावासाची शिक्षा :—**

दिनांक ०४.०९.२०२६ रोजी मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कोर्ट क्र. १०, नागपुर श्री. एस. के. सोनावणे साहेब यांनी त्यांचे कोर्टाचे केस क्र. १५९/२०२४ मधील, पोलीस ठाणे सायबर येथील अप. क्र. ९६/२०२३ कलम ४२०,४६५,४६७,४६८,४७१,३४ भा.दं.वि., सहकलम ६६(ड) माहिती तंत्रज्ञान कायदा, सहकलम १४ फॉरेनर ॲक्ट या गुन्ह्यातील आरोपी Chinonso Nwankwo Rafhel (नायजेरीयन नागरिक) वय ३९ वर्षे, रा. ६०४/डी, कासा अरबॅनो, तळोजा बायपास रोड, डाऊन—टाऊन, पलावा सिटी, डोंबीवली (इस्ट) जि. ठाणे याचेविरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, आरोपीस कलम ४२० भा.दं.वि. अन्वये ०२ वर्ष ०६ महिने सश्रम कारावासाची शिक्षा व ५०,०००/—रू. दंड आणि दंड न भरल्यास ०३ महीने अतिरीक्त कारावासाची शिक्षा तसेच, कलम ४७१ भा.दं.वि. अन्वये ०२ वर्ष ०६ महिने सश्रम कारावासाची शिक्षा व ५०,०००/—रू. दंड आणि दंड न भरल्यास ०३ महीने अतिरीक्त कारावासाची शिक्षा तसेच, कलम १४ फॉरेनर ॲक्ट. अन्वये ०१ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा व ५०,०००/—रू. दंड आणि दंड न भरल्यास ०३ महीने अतिरीक्त कारावासाची शिक्षा ठोठावली.

फिर्यादी यांचे लाईफ लाईन नावाचे फार्मसी दुकान असून, त्यांनी मार्च २०२३ पासुन एक्स्पोर्टचा व्यवसाय सुरु केला होता. दिनांक ०६.०९.२०२३ ते २९.०९.२०२३ दरम्यान, फिर्यादीचे मोबाईलवर मॅसेज आला की, ‘आम्हाला रियायबल, जेन्युईन सप्लायरची भारतात आवश्यकता आहे’ असे सांगुन आरोपीने फिर्यादीला विश्वासात घेतले व कार्डीयाक ऑर्गनिक पावडरची ऑर्डरचे नावाखाली आरोपीचे वेगवेगळ्या बॅक खात्यात एकूण १५,८५,०००/—रू. फिर्यादीस पाठविण्यास भाग पाडले. फिर्यादीने रक्कम पाठविली असता, आरोपीने कोणताही माल पाठविला नाही व पैसेही परत केले नाहीत. अशाप्रकारे आरोपीने फिर्यादीचा अन्यायाने विश्वासघात करुन, त्यांची आर्थिक फसवणुक केली. फिर्यादी निलेश गोविदराव जिवतोडे, वय ४५ वर्षे, रा. प्लॉट क्र. ३०१, एचआर हाईट्स, झिंगाबाई टाकळी, गोधनी रोड, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सायबर येथे आरोपींविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपीस दिनांक १४.१०.२०२३ रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्ह्याचे तत्कालीन तपासी अधिकारी पोनि. अमित डोळस व सपोनि. मारोती शेळके यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्रीमती प्रियंका चोपडे यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्री. अतुल सेजल यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी पोहवा. चंद्रशेखर डडमल यांनी काम पाहिले.

**२) नागपुर शहर वाहतुक शाखा अंतर्गत ''नो रॉन्ग साईड'' मोहीम :–**

मा. पोलीस आयुक्त, श्री. विश्वास नागरे पाटील यांचे कल्पनेतून, नागपुर शहरात अपघाती मृत्युंवर नियंत्रण आणण्याचे दुष्टीने ''नो रॉन्ग साईड'' मोहिम राबविली जात आहेत. ही मोहीम नागपूर शहर वाहतुक शाखेकडून मा. श्री. आदित्य मिरखेलकर पोलीस उप आयुक्त (वाहतुक), मा. श्री. गिरीश बने सहाय्यक पोलीस आयुक्त (वाहतुक) यांचे मार्गदर्शनात राबविली जाणार आहे. विरूध्द दिशेने वाहन चालविल्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढत असल्याने ही मोहिम सुरू करून, विरूध्द दिशेने वाहन चालविणाऱ्यांविरूध्द गुन्हे दाखल करणे व नागरिकांमध्ये रॉन्ग साईड वाहन न चालविने यासाठी जनजागृती करण्यात येत आहे.

नागपूर शहरात बरेचशे नागरिंक शॉर्टकट घेण्याच्या नादामध्ये रॉन्गसाईड वाहन चालवित जात असतात. त्यामुळे रस्त्यावरील पादचारी, इतर वाहन चालकाचे जीव धोक्यात येतात. तसेच अपघातानंतर कुटुंबावर सुध्दा आर्थिक मानसिक भार येतो. त्यामुळे रॉन्ग साईड जाणाऱ्या वाहन चालकावर गुन्हे दाखल करण्याबाबत मा. पोलीस आयुक्तांनी सुचना दिल्या आहेत.

सोनेगांव वाहतुक परिमंडळ तर्फे 'नो रॉन्ग साईड' मोहिमेअंतर्गत रॉग साईड वाहन चालविणाऱ्या चालकांवर दिनांक २२.०८.२०२५ रोजी ते दिनांक ३०.०८.२०२६ पर्यत कलम २८१ भा.न्या.सं. अन्वये एकुण ४४ गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

वाहतुक सोनेगांव विभाग नागपूर द्वारे शहरातील जनतेला आवाहन करण्यात येत आहे की, शहरातील नागरिकांनी रॉन्ग साईड वाहने चालवू नये. जेणेकरून भविष्यात वाहन अपघात सारख्या गंभीर घटनामध्ये जिवीत हाणी होणार नाही. यापुढे सोनेगांव वाहतुक परिमंडळ हद्द्‌ीतील कार्यरत बिट अधिकारी, अंमलदार, पिटर मोबाईलद्वारे सतत पेट्रोलींग करण्यात येवुन, यापुढे ही कार्यवाही नियमित सुरू राहणार असुन, रॉन्गसाईड चालकांवर गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत.

**(कामगिरी)**

**१) अजनी पोलीसांची कामगिरी :– परिमंडळ क्र. ४ अंतर्गत कुख्यात गुंड हद्दपार.**

पोलीस ठाणे अजनी हददीत चंद्रमणी नगर, गल्ली नं. १, एनआयटी गार्डन जवळ, अजनी, नागपूर येथे राहणारा गुन्हेगार ईसम नामे आकाश नरेश रामटेके, वय २४ वर्षे याचेविरूध्द पोलीस ठाणे अजनी येथे दरोडा, अंमली पदार्थांचे सेवन करणे, विनयभंग करणे, संगनमत करुन गंभीर दुखापत करणे, घरफोडी करणे, वाहनचोरी करणे, धमकी व शिवीगाळी करणे इत्यादी गंभीर स्वरूपाचे विविध गुन्हे दाखल आहेत. त्याचेवर वारंवार कायदेशिर कारवाई करूनही, त्याचे प्रवृत्तीत कोणतीही सुधारणा झाली नाही. नमुद गुन्हेगार इसमाचे वर्तणुकीत सुधारणा व्हावी, याकरीता अजनी पोलीसांनी आरोपीविरूध्द हद्दपार प्रस्ताव तयार करून, मा. पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०४, नागपुर शहर याचेकडे सादर केला. मा. श्रीमती रश्मिता राव, पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०४, नागपुर शहर यांनी हददपार आदेश क्र. १४/२०२६ दिनांक २९.०८.२०२६ अन्वये गुन्हेगारास नागपूर शहर व नागपुर ग्रामीण हद्दीतून ०२ वर्षाकरीता हद्दपार करण्याचा आदेश पारीत केला. नमुद गुन्हेगाराचे हद्दपार आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली असुन, अजनी पोलीसांनी नमुद हद्दपार इसमास दिनांक ३०.०८.२०२६ रोजी शिवनी (मध्य प्रदेश) येथे त्याचे नातेवाईक यांचेकडे सोडलेले आहे.

नमुद हद्यपार इसम हा नागपूर शहर पोलीस आयुक्तालयाचे हद्यीत दिसुन आल्यास, नजिकच्या पोलीस ठाणे अथवा डायल ११२ वर संपर्क साधावा.

वरील कामगिरी मा. श्रीमती रश्मिता राव, पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०४, नागपुर शहर, मा. श्री नरेंद्र हिवरे, सपोआ., अजनी विभाग यांचे मार्गदर्शनात, पोलीस ठाणे अजनी येथील वपोनि. नितीनचंद्र राजकुमार,

पोउपनि. सिध्दांत मस्के, पोहवा. शालिकराम शेंडे, दिपक अटाळकर, पोअं. प्रविण खवशे, रोशन वाडीभस्मे व मपोअं. सिमा भोयर यांनी केली.



आकाश नरेश रामटेके

**२) गणेशपेठ पोलीसांची कामगिरी :— गांजा बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०३.०९.२०२६ चे १९.२० ते २३.०० वा. चे दरम्यान, गणेशपेठ पोलीसांना खात्रीशीर माहिती मिळाली की, हंसा ट्रॅव्हल्सचे बसने रायपुर ते इंदोर प्रवास करणारे ०३ प्रवासी गांजा बाळगुन आहेत. अशा खात्रीशीर माहितीवरुन, पोलीस ठाणे गणेशेपठ हद्दीत हंसा ट्रॅव्हल्स ऑफीस, राहुल कॉप्लेक्स—१, यात्री हॉटेल समोर, गणेशपेठ नागपूर येथे सापळा रचुन, पंचासमक्ष रेड कार्यवाही केली असता, बसमध्ये मोबाईल क्र. ९५२०५९०१४० चा वापर करून तिकीट बुक केलेले मोबाईलनंबर वापरकर्ते प्रवासी पाहीजे आरोपी क्र. १) हर्षद २) वसिम ३) आसिफ यांचे आरक्षित सिटवर एकुण तीन बॅग दिसुन आल्या. पंचासमक्ष बॅगची पाहणी केली असता, त्यामध्ये हिरवा तपकिरी रंगाचा उग्र वास असलेला ओलसर गांजा वजनी २१.३२० किलोग्राम मिळुन आला. नमुद आरक्षित सिटवरील प्रवासी यांची परीसरात पाहणी केली असता, ते मिळून आले नाहीत. घटनास्थळावरुन गांजा व तीन ट्रॅव्हल्स बॅग असा एकूण १०,७२,०००/—रू. चा मुद्येमाल मिळुन आल्याने जप्त करण्यात आला. आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता गांजा बाळगुन वाहतुक करीत असल्याचे निष्पन्न झाल्याने, आरोपींविरुध्द पोलीस ठाणे गणेशपेठ येथे कलम ८(क), २०(ब)(क),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. पाहीजे आरोपींचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. राहुल मदने पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ३), मा. श्री. राजेश तटकरे सहा. पोलीस आयुक्त (कोतवाली विभाग) यांचे मार्गदर्शानाखाली, वपोनि. अतुल तवाडे व त्यांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.

**३) यशोधरानगर पोलीसांची कामगीरी :— घरफोडी व वाहनचोरी करणाऱ्या आरोपींना अटक.**

दिनांक २७.०८.२०२६ चे १५.०० वा. ते ३१.०८.२०२६ चे ०७.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत, रमाई नगर, पिवळी नदी, दालमिल जवळ राहणाऱ्या फिर्यादी सौ. करीश्मा दिनेश गिरी, वय २९ वर्षे ह्या आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह रक्षाबंधन निमीत्ताने बुटट्बिोरी येथे गेल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप तोडून, आत प्रवेश करुन, बेडरुममधील आलमारीतील रोख ५,०००/—रू. तसेच, चांदीचे वेगवेगळे दागिने व सोनाटा कंपनीची घड्याळ असा एकुण किंमती ९,५००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे यशोधरानगर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान यशोधरानगर पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून, मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपींना निष्पन्न करुन, आरोपी १) मोहम्मद फिरोज मोहम्मद रईस शेख, वय २३ वर्षे, रा. माजरी, फुल बगिच्याजवळ, कळमणा २) मोहम्मद साजिद उर्फ पप्पु जमालद्दीन अन्सारी, वय २५ वर्ष रा. कामठी, अब्दुला शबाब असल दर्गाहजवळ, कामगार नगर, नवीन कामठी, नागपूर ३)

मोहम्मद जमील उर्फ बेचु मुरीद अहमद अन्सारी, वय ४० वर्षे, रा. माजरी, शाहनवाज ले—आऊट, इंडीयन फार्मसी जवळ, यशोधरानगर यांना ताब्यात घेतले. आरोपींना गुन्हयासंबंधाने विचारपुस केली असता, त्यांनी वर नमुद घरफोडीचा गुन्हा संगनमताने केल्याची कबुली दिली. आरोपींना अधिक सखोल विचारपुस केली असता, त्यांनी वर नमुद गुन्ह्याव्यतीरिक्त पोलीस ठाणे यशोधरानगर हद्यीत इतर ठिकाणी एक वाहनचोरी केल्याचे सांगितले. आरोपींचे ताब्यातुन गुन्हयातील चोरी गेलेली एक सोनाटा कंपनीची घडयाळ, चांदीचे दागिने, अॅक्टिवा मोपेड क्र. एमएच ४९ एयु ३६९६ तसेच, गुन्हयात वापरलेली सुझुकी बर्गमन मोपेड क्र. एमएच ४९ सीयु ५५३२ असा एकुण कि. १,६३,७००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीकडून घरफोडीचा एक व वाहनचोरीचा एक असे एकुण ०२ गुन्हे उघडकीस आणलेले आहेत. आरोपींना अटक करण्यात आली असून, पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमणा विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. श्री. युनुस चांद शेख, पोउपनि. अनंत पाटील, पोहवा. राहुल बोंद्रे, पोअं. अमोल झरकर, संदीप वानखेडे, शितेश चौरसिया, भुषण येरोजवार, प्रविण बावणकर यांनी परिमंडळीय सायबर सेलचे पोअं प्रविण इनवाते यांचे मदतीने केली.

**<u>४) सिताबर्डी पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरी करणाऱ्या आरोपीस अटक. ०५ गुन्हे उघडकीस.</u>**

दिनांक २८.०८.२०२६ चे ००.०५ वा. ते १४.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे सिताबर्डी हद्यीत कोष्टीपुरा, बैद्यनाथ बिल्डींगजवळ, मेन रोड, सिताबर्डी येथे राहणारे फिर्यादी मोहम्मद जाकीर नवाज, वय ४० वर्षे, यांनी त्यांची काळ्या रंगाची इलेक्ट्रीक मोपेड किंमती अंदाजे ६०,०००/—रू. ची ही आपले राहते घरासमोर लॉक करून, पार्क करून ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची गाडी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सिताबर्डी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हयाचे तपासात पोलीस ठाणे सिताबर्डी येथील तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून व मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून आरोपी तपिश राहुल बागडे, वय २४ वर्षे, रा. प्लॉट क्र. के/३८, हरीजन कॉलनी, नझुल ले—आऊट, जरीपटका, नागपूर यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्याने वर नमुद वाहनचोरीचा गुन्हा त्याचा साथीदार पाहिजे आरोपी ऋषभ चंद्रशेखर कावळे, वय २५ वर्षे, रा. लेंडी मैदानाजवळ, हरीजन कॉलनी, नझुल ले—आऊट, जरीपटका, नागपूर याचेसोबत संगणमताने केल्याची कबुली दिली. आरोपीस अधिक सखोल विचारपूस केली असता, त्यांनी वर नमुद गुन्हयाव्यतिरिक्त पोलीस ठाणे सिताबर्डी हद्यीत इतर ठिकाणी एक वाहनचोरी, पोलीस ठाणे गणेशपेठ हद्दीत ०२ वाहनचोरी, पोलीस ठाणे एमआयडीसी हद्यीत ०१ वाहनचोरी असे एकूण ०५ वाहनचोरी चे गुन्हे केल्याचे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन इलेक्ट्रीक मोपेड सह एकुण १२ दुचाकी वाहने एकूण किंमती ५,५५,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पाहिजे आरोपीचा शोध पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती विनिता शाहु, अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रभाग, श्रीमती अन्नपुर्णा सिंग, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. २), मा. श्री. सुनिलसिंग पवार, सहा. पोलीस आयुक्त (सिताबर्डी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. सुहास राऊत, दुपोनि. मनिष कोल्हटकर, पोउपनि. श्याम वारंगे, राहुल वंजारी, पोहवा. नंदकिशोर वालदे, शत्रुघ्न मुंडे, पोअं. प्रशांत भोयर, चेतन शेंडे, सचिन भोयर, नैनिश तलवारे व मपोअं अनिता वरकडे यांनी केली.



**<u>५) पोलीस उपआयुक्त, परिमंडळ क्र. ६ विशेष पथकाची कामगिरी :— सट्‌टापट्‌टी जुगाराची खायवडी करणारे आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ०३.०९.२०२६ रोजी मा. पोलीस उपआयुक्त, परिमंडळ क्र. ६ यांचे विशेष पथकास खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस ठाणे जुनी कामठी हद्दीत बकरा का मेला, जुना कब्रस्तान, अम्मा जानकी दर्गाह मागे, कामठी येथे सट्‌टापट्‌टी जुगारावर खायवडी करीत आहेत. अशा खात्रीशीर माहितीवरुन नमुद ठिकाणी पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, त्याठिकाणी आरोपी क्र. १) विक्की राजु गद्‌दलवार, वय ४० वर्षे, रा. बकरा का मेला, मोहब्बते पानठेल्यामागे, कामठी २) निखिलेश राजानंद गजभिये, वय ३४ वर्षे, जुनी खलाशी लाईन, कामठी, नागपूर हे ग्राहकांकडून पैसे स्विकारून सट्‌टापट्‌टीवर खायवाडी करतांना समक्ष मिळून आले. त्यांचा साथीदार पाहिजे आरोपी ३) इकबाल बेग हा घटनास्थळावरुन पसार झाला. आरोपींचे ताब्यातुन खायवाडीचे रोख ५,३००/—रू. व सट्‌टापट्‌टीचे साहित्य असा एकुण ५,३०५/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींविरूध्द पोलीस ठाणे जुनी कामठी येथे कलम १२ महा. जुगार प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. पाहीजे आरोपींचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री रमेश धुमाळ, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ६) यांचे मार्गदर्शनाखाली त्यांचे विशेष पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.



**<u>(गुन्हे)</u>**

**<u>१) पोलीस ठाणे कळमणा :— शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक ०३.०९.२०२६ चे १४.२५ ते १४.४० वा. चे दरम्यान, कळमणा पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, कळमणा मार्केट, चिखली गेटजवळ, जड वाहन पार्कींग येथे एक इसम हातात चाकु घेवून धूमाकूळ घालत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, मिळालेल्या वर्णनाचा इसम हातात शस्त्र घेवुन धुमाकुळ घालतांना दिसल्याने, त्यास घेराव करून ताब्यात घेतले व त्याचे हातातील लोखंडी चाकु काढुन घेतला. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव महेंद्र विश्वनाथ मरई, वय ३२ वर्षे, रा. आदिवासी प्रकाशनगर, गली क्र. १, कळमणा, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन लोखंडी चाकु किंमती ५००/—रू. चा जप्त करण्यात आला आहे.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेवुन धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे कळमणा येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का, सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे कोराडी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

पोलीस ठाणे कोराडी हद्यीत, ग्रॅन्ड १९, महालक्ष्मी सिटी, आऊटर रिंग रोड, बोखारा येथे राहणारे फिर्यादी संजीवकुमार प्रेमप्रकाश अग्रवाल, वय ६३ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन, त्यांचे मुलीकडे मागील दिड वर्षापासुन राहत आहेत. त्यांचे घराची साफसफाई करण्याकरीता श्रीमती अर्चना कुशाराम, रा. बोखारा, कोराडी हया येत असतात. कामवाली बाई सफाईचे कामाकरीता गेली असता, तिने फिर्यादी यास चोरीबाबत माहिती देऊन, फिर्यादी यांनी पाहणी केली असता, दिनांक ०२.०९.२०२६ चे २२.०० वा. ते दिनांक ०३.०९.२०२६ चे ११. ३० वा. चे दरम्यान, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे सेंट्रल लॉक तोडुन, घराचे आंत प्रवेश करून, बेडरूममधील लाकडी आलमारीतील रोख १,९५,०००/—रू. तसेच, सोन्याचे दागिने असा एकुण किंमती २,०७,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेल्याचे दिसुन आले.

यापकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कोराडी येथे मपोउपनि. निशा गवळी ९८३४३२७९२५ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५,३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे जरीपटका :—** चंद्रप्रकाश हिमांशु राव, वय ३७ वर्षे, रा. प्लॉट नं. ६३०, आहुजा नगर, जरीपटका, नागपूर हे दिनांक ०२.०९.२०२६ रोजी ११.०० वा. चे सुमारास पोलीस ठाणे जरीपटका हद्दीतील राहते घरून कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता, मिळून आले नाही. **वर्णन** रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—मध्यम, उंची—५ फुट ५ इंच, केस—काळे, अंगात—काळया रंगाचा हॉफ पॅन्ट व निळया रंगाची टिशर्ट घातलेली आहे. भाषा— हिंदी बोलतात.

**२) पोलीस ठाणे अजनी :—** शंकर नामदेव धुमाळे वय ६५ वर्षे, रा. माळीपुरा वार्ड, पुसद जि. यवतमाळ ह.मु. रामश्वरी नगर, प्लॉट क्र. १८०, वानखेडे आटा चक्कीजवळ, नागपूर हे दिनांक ०२.०९.२०२६ रोजी १०.३० वा. चे सुमारास पोलीस ठाणे अजनी हद्दीतील मुलीचे राहते घरून कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता, मिळून आले नाही. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा—लांबट बांधा—सडपातळ, उंची—५ फुट १ इंच, केस—काळे पांढरे, अंगात—पांढरे रंगाचा चौकडीचा शट व जांभळा फुलपॅन्ट घातलेल आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलतात



चंद्रप्रकाश



शंकर

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**